# 'स्वरूप' वर्धिनी

४२८/२०, शिवाजीनगर
पुणे - ४११ ०१६.



## अहवाल
## १९८१

पुणे महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांतून व इतर काही शाळांमधील निवडलेली मुले 'स्व-रूप' वर्धिनीत येतात. एकही दिवस सुट्टी न घेता वर्षभर सतत काहीतरी नवीन उपक्रम चालू असतात. तिळगुळ समारंभ 'स्व-रूप' वर्धिनीतर्फे दर वर्षी साजरा केला जातो. यंदाचा हा तिसरा समारंभ. समारंभाच्या निमित्ताने दैनंदिन उपक्रमांव्यतिरिक्त वर्धिनीने केलेल्या कामांचा अहवालही सादर केला जातो. १९८१ या वर्षात वर्धिनीने केलेल्या कामांचा अहवाल आपल्या हाती सुपूर्द करीत आहोत.

येथे येणारी मुले ही आमच्या संपर्कात दिवसभरात केवळ ३-४ तासच असतात. उरलेला वेळ ते बाहेरच्या परिस्थितीत असतात आणि त्याचाही बरा-वाईट परिणाम त्यांच्या जडण-घडणीवर होत असतो. हे लक्षात घेऊन आपण या अहवालाचे मूल्यमापन करावे. अशा परिस्थितीत उपलब्ध वेळाचा जास्तीत जास्त फायदा घेऊन ही मुले चांगले नागरिक कशी बनतील यासाठी आम्ही धडपड करीत आहोत. १९८१ या वर्षात काय काय करून कोणते उपक्रम योजले याचाच हा आढावा आहे.

शैक्षणिक विषयांव्यतिरिक्त इतर विविध विषयांचे ज्ञान मुलांना मिळावे या उद्देशाने प्रत्येक शनिवारी आणि रविवारी विविध विषय मुलांपुढे मांडले जातात आणि अनेक तज्ज्ञ व्यक्ती मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी मुद्दाम येतात. या वर्षी सुद्धा अनेक व्यक्ती येऊन गेल्या.

| असे वक्ते | अशी व्याख्याने |
|---|---|
| १ ) डॉ. श्रीकांत बहुलकर | 'पाणी पंचायत' आणि 'श्रद्धानंद महिलाश्रम' |
| २ ) श्री. माधवराव मेहेंदळे | कुष्ठरोग निवारण व आरोग्य |
| ३ ) श्री. शरदराव कुलकर्णी | आदिवासी क्षेत्रातील जनजागरण |
| ४ ) श्री. प्रभाकर लिमये | स्वामी विवेकानंद - चरित्र |
| ५ ) श्री. श्री. ग. मुणगेकर | डॉ. नानासाहेब परुळेकर - चरित्र व सकाळची उभारणी |
| ६ ) श्री. पंडितराव अत्रे | नारो अप्पाजी खिरे यांचे व्यक्तिमत्त्व कसे घडले व तुळशीबागेची स्थापना |

| | |
|---|---|
| ७ ) श्री. केशवराव पत्की | ध्येयवादी सेवा |
| ८ ) श्री. नानासाहेब पटवर्धन | महाभारत कथा |
| ९ ) डॉ. अशोकराव निरफराके | मुलाखती कशा द्याव्यात? |
| १० ) प्रा. माधवराव परांजपे | मैं नहीं तू ही |
| ११ ) आमदार डॉ. अरविंद लेले | विधानसभेतील प्रत्यक्ष कामकाज |
| १२ ) श्री. ज्ञानेश्वर शालव | अरुणाचल प्रदेशातील विवेकानंद केंद्राचे कार्य |
| १३ ) श्री. वैद्य व श्री. मराठे | नागरी संरक्षण आणि प्रथमोपचार |
| १४ ) श्री. भास्करराव गद्रे | इंग्लंडमधील वांशिक दंगली |
| १५ ) प्रा. डॉ. दादासाहेब पुणतांबेकर | कोजागिरी पौर्णिमा |
| १६ ) श्री. शरदराव बेलवलकर | स्लाईड्‌स्‌द्वारे हिमालय-दर्शन |

## शिबिरे :-

दैनंदिन उपक्रमांव्यतिरिक्त दिवाळीच्या सुट्टीत आणि मे महिन्याच्या सुट्टीत शिबिरे योजली जातात. आतापर्यंत विविध हेतूंनी प्रेरित अशी ७ शिबिरे झाली, त्यापैकी ३ शिबिरे या वर्षात झाली.

## ( १ ) 'अनाथ सहवास शिबिर' लोणावळा :-

आपण नेहमी आपल्याच परिस्थितीचा विचार करतो. परंतु ज्यांना स्वतःचे घरदार तर सोडाच परंतु प्रेम लावणारी माणसे सुद्धा नाहीत अशा अनाथ, बेवारशी मुलांचे जीवन कसे असते हे मुलांना समजावे या हेतूने लोणावळा येथील अंतरभारती बाल-ग्राम मध्ये त्या मुलांच्या सहवासात एक शिबिर घेण्यात आले.

| | |
|---|---|
| शिबिर काल | — ५ मे ते १५ मे १९८९ |
| विद्यार्थी संख्या | — ४७ + बालग्राम मधील १४ मुले |
| शिक्षक संख्या | — ८ |

### शिबिरात मांडलेले विषय :-

- समाजाचे आणि आपले नाते काय? प्रश्नोत्तरे - डॉ. निरफराके
- किर्तन माध्यमातून विज्ञान विषय व लावणीतून आरोग्याची महती, क्रांतिकारक कथा - श्री. प्रदीप आगाशे
- चित्रकलेतील कौशल्ये - श्री. अरूण फडणीस
- दातांची निगा - डॉ. प्रसाद जोशी
- जिद्द-जिगर निर्मिती-गोष्टी - श्री. सुरेशराव परचुरे
- बालशौर्य सत्य कथा - श्री. श्रीधर राजगुरू व सौ. राजगुरू

### शिबिरातील विशेष कार्यक्रम :-

- काठ्यांवर उभे राहून चालण्याचा सराव
- एकाच वेळी तीन जळत्या कड्यांमधून उड्या मारण्याचा सराव
- डॉ. प्रसाद जोशी यांनी स्व-रूप वर्धिनी व बालग्राममधील सर्व मुलांच्या दातांची तपासणी केली व आवश्यक त्या मुलांवर त्वरीत उपचारही केले.

## शिबिराबद्दल मुलांच्या काही प्रतिक्रिया : त्यांच्याच शब्दात

१ ) क्रांतिकारकांप्रमाणे आपणही देशसेवा करावी.
२ ) वर्धिनीचे काम करताना येणाऱ्या अडचणींवर मात कशी करता येईल ?
३ ) आपणही मोठेपणी अशीच वर्धिनी काढून गरीब मुलांना ज्ञान द्यावे व देशाचे भवितव्य उज्ज्वल घडवावे.
४ ) घरात आई-वडील असताना त्यांचे महत्त्व कळत नाही परंतु ज्यांना आई-वडील नाहीत अशांकडे पाहिल्यावर हृदय उचंबळून येते.
५ ) बालग्रामची मुले एकटी आहेत, त्यांना मदत केली पाहिजे.
६ ) बालग्राममधील मुलांमध्येही गुण आहेत. मात्र त्यांना वर्धिनीतील मुलांप्रमाणे वाव मिळायला हवा.
७ ) यापुढे निश्चयाने सतत पुढे जायचे, मागे फिरणे नाही.
८ ) माझी महत्वाकांक्षा काय ? मी स्व-रूप वर्धिनीच्या कामांस काही मदत करू शकेन का ? कधी आणि कशी ?
९ ) माणूस थोर व अलौकिक कसा बनू शकतो हे समजले. आता त्याप्रमाणे वागण्याचा विचार व प्रयत्न करायला हवा हे ठरले.
१० ) आम्ही वाईट वागलो तरी बालग्रामच्या सदनमाता त्यांच्या मुलांना रागावत, आम्हाला नाही. यामध्ये त्यांच्या मनाचा किती मोठेपणा आहे हे दिसले.
११ ) कोणतीही गोष्ट आत्मविश्वासाने करता येते. नाही अशक्य म्हणायचे नाही.

## बालग्राममधील मुलांच्या काही प्रतिक्रिया :

१ ) आम्हालासुध्दा धीटपणाने लोकांसमोर बोलता येईल असा आत्मविश्वास निर्माण झाला.
२ ) शिबिर लवकर संपल्यामुळे हुरहुर वाटली. आणखी ३-४ दिवस तरी शिबिर हवे होते.
३ ) वर्धिनीमधील मुलांबरोबर ५-७ दिवस पुण्यात घालवावेसे वाटतात.

## शिबिरामुळे झालेला परिणाम, बदललेल्या सवयी :

१ ) गार पाण्याची आंघोळ -
२ ) दोन वेळा दांत घासण्याची सवय -
३ ) आवडत नसलेले पदार्थ खाण्याची सवय-
४ ) लवकर उठण्याची सवय.
५ ) खोडकरपणा कमी झाला.
६ ) सहनशीलता वाढली.
७ ) स्वतःच्या आळशीपणाची घृणा वाटली.

## ( २ ) मुक्या भावना बोलक्या झाल्या :- पुणे

मैदानी खेळांची मुलभूत कौशल्ये शिकविण्याच्या उद्देशाने सर परशुरामभाऊ - महाविद्यालयाच्या आवारातील रूइया मूकबधीर विद्यालयात दुसरे शिबिर घेण्यात आले. या विद्यालयातील काही मूकबधीर मुलांचा सहवास, एक आगळाच अनुभव होता. आपण किती कमी धडपड करतो हे मूकबधीर मुलांच्या धडपडीमुळे स्पष्टपणे जाणवले.

ही मुले किती धडपडी आणि कर्तृत्ववान असतात याचा प्रत्यक्ष अनुभव आला.

कालावधी - १७ ऑक्टोबर ते २३ ऑक्टोबर १९८९.
स्थळ - रूइया मूकबधीर विद्यालय. पुणे.
विद्यार्थी संख्या - ५५.
शिक्षक संख्या - ४.
सर्वश्री गुरव, राघव अष्टेकर व गोरीकर यांनी मैदानी खेळातील मूलभूत कौशल्ये शिकविण्याची जबाबदारी घेऊन, धावणे, लांब उडी, ऊंच उडी, गोळा फेक, थाळीफेक, फूटबॉल, व्हॉली बॉल इ. खेळातील मूलभूत कौशल्ये वैयक्तिक लक्ष देऊन शिकविली.

## शिबिरात मांडलेले काही विषय :

| | |
|---|---|
| श्री. ना. नी लिमये | हिंडता होती शहाणे. |
| प्राचार्य वामनराव अभ्यंकर | आवडते शिक्षक व आवडते विद्यार्थी |
| श्री. किशोरराव करंदीकर | वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन |
| श्री. नानासाहेब पटवर्धन | हनुमानाची रामावरील निष्ठा |
| उपप्राचार्य श्री. शङ्लिकर | काम्प्युटरची रचना व कार्य |
| प्रा. न. म. जोशी | गप्पा कशा मारायच्या? |
| प्रा. शरद वाघ | वक्तृत्व विकास व क्रांतिकारकांच्या कथा |
| प्रा. रामभाऊ डिंबळे | निर्भयता ( भुताची गोष्ट ) |
| श्री. रविकुमार हिंगे आणि सहकारी | पोवाडे |
| श्री. संतोष काळे आणि सहकारी | पोवाडे, लावणी, अभंग |

## मुलांच्या प्रतिक्रिया :

- पुणे शिबिरात जे खेळ आम्ही खेळलो, ते आम्ही पूर्वी कधी पाहिले सुद्धा नव्हते.
- स्वावलंबनापासून मिळणारा आनंद वेगळा असतो, तो पुढे मोठे झाल्यावर पण उपयोगी पडतो.
- कु. हेमा साठे ह्या मूकबधीर मुलीने प्रयत्न करून एक गाणे म्हणून दाखविले. हा प्रसंग मला अतिशय आवडला.
- खेळ खेळल्यावर मन प्रसन्न व आनंददायक बनते. त्यामुळे स्मरणशक्ती वाढते व अभ्यास चांगला होतो.
- इथे शिकलेल्या कौशल्यांचा शाळेतील स्पर्धांमध्ये निश्चित फायदा होईल.

## ( ३ ) केल्याने देशाटन.... मुक्काम मुंबई

| | |
|---|---|
| शिबिरस्थळ | - पोद्दार कॉलेज ऑफ कॉमर्स, माटुंगा |
| कालावधी | - ३० ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर १९८९ |
| विद्यार्थी संख्या | - ३३ |
| शिक्षक संख्या | - ८ |
| उद्देश | - (१) सामाजिक कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थांना भेट देऊन मुलांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करणे. |

(२) मुलांच्या ज्ञानात भर पडेल अशा विविध ठिकाणांना भेटी देणे.

## भेट दिलेली काही नवी तीर्थक्षेत्रे :

- श्रद्धानंद महिलाश्रम
- आनंद केंद्र
- सेंट कॅथरिन्स होम
- मंडपेश्वर
- साने गुरुजी विद्यालय
- नवीन विधानभवन
- पी. व्ही. डी. टी. कॉलेज
- श्रमिक विद्यापीठ
- नेहरू तारांगण (प्लॅनेटोरियम)
- कोश केंद्र (खादी ग्रामोद्योग)
- सायन्स गार्डन
- दूरदर्शन केंद्र
- जहांगीर कला दालन (आर्ट गॅलरी)
- नेव्हल डाकयार्ड (आय. एन. एस. विक्रांत, मैसूर क्षेपणास्त्र जहाज, पाणबुडी)

## मुलांच्या मनात वैचारिक वादळ उठवलय यांनी .....

| | |
|---|---|
| १) श्री. केशवराव लिमये | हे असे का? भारतातील सद्यस्थिती |
| २) प्राचार्य यां. ना. फुटाणे | आदर्श वर्तणूक |
| ३) प्रा. गांगल | वर्तन, वाणी व विचार सुधारणा |
| ४) श्री. जयंत मजली | उद्योगातील यशासाठी झगडा |
| ५) सौ. मालतीबाई तुळपुळे | ज्याची गती त्याच्या हाती (व्यक्तिमत्त्व विकास) |
| ६) श्रीमती डॉ. रजनीबेन अशर | वाचनवेग कौशल्य |
| ७) श्रीमती सुनिता संभुस | अभ्यास कौशल्ये |
| ८) डॉ. नाफडे | व्यवसाय मार्गदर्शन |
| ९) श्री. जयसिंगभाई मरीवाला | आग्नेय आशिया दौऱ्यातील अनुभव |
| १०) आ. प्रा. राम कापसे | समाजसेवा व राजकारण - गप्पागोष्टी |

## वैचारिक वादळ (मुलांच्या मनातील) अर्थात् त्यांच्याच शब्दात :

१) श्रध्दानंद महिलाश्रम पहाताना लक्षात आले की, असे काम करणे सोपे नाही. धैर्य, चिकाटी, कष्ट यापुढे सर्व संकटे शरण येतात. या सर्व गोष्टी त्यांच्या अंगात आहेत. म्हणून ते असे उपयुक्त कार्य करणारी संस्था पुढे आणू शकले.

२) आईकडील आणि स्व-रूप वर्धिनी यामध्ये आता अंतर पडू द्यायचे नाही. कारण स्वतःची प्रगती साधून दुसऱ्याचे दुःख दूर करण्यासाठी स्वतःची कंबर कसावयाची आहे.

३) आज देशात एवढी बिकट परिस्थिती असताना आपण झोपा काढतो याची लाज वाटते.

४) मी आजच्या जगाप्रमाणे न बनता सावरकर, स्वामी विवेकानंद यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन मातृभूमीची सतत आठवण ठेवीन.

५) राष्ट्र कसे पुढे येईल याचे चिरंतन स्मरण असले पाहिजे.

६) आपण लहानसा धंदा करावा आणि स्व-रूपवर्धिनीस हातभार लावावा.

७) मी जे शिकलो ते दुसऱ्यांना शिकविण्याचा प्रयत्न करीन.

८) आपल्या देशातील सर्वात मोठा शत्रू 'आळस' हा आहे. तो झटकला तर देश पुढे जाईल.

९) स्व-रूप वर्धिनी एक टाकसाळ आहे. येथे निरनिराळ्या वृत्तीच्या लोकांना एकच आकार द्यायचा व त्यांचेवर चांगले संस्कार करायचे हे तिचे स्वप्न आहे.

१० ) मोठे झाल्यावर 'वर्धिनी' साठी सुद्धा काही तरी केलेच पाहिजे.
११ ) आप-आपसातील दुःखे वाटून घेण्याची येथे कोणाचीच तयारी नसते. प्रत्येकजण फक्त पैशासाठी काम करीत असतो. कोणीही कोणाचीच पर्वा करीत नाही. हे बदलले पाहिजे.
१२ ) चारही दिशांनी आम्हाला मदतीचे हात मिळताहेत, पण मदत घेण्याची पात्रता निर्माण करण्याचा व त्याचा उपयोग करण्याचा मी प्रयत्न करणार आहे.
१३ ) भारत समृद्ध करण्यात आपणही काही वाटा उचलूया.
१४ ) अनाथ मुलांना पाहून स्वतः काहीतरी करावे हा नवीन प्रेरणादायक विचार स्फूरला.

## इतर उल्लेखनीय घटना :-

दर आठवड्यातील विविध विषयांवरील व्याख्याने, शिबिरे, दैनंदिन उपक्रम या व्यतिरिक्त इतरही काही उल्लेखनीय उपक्रम या वर्षात पार पाडले.

१ ) दर वर्षी प्रमाणे या वर्षीही दोन पालक शिक्षक सभा झाल्या. शेवटच्या सभेला एकूण सप्त पालक हजर होते. या सभेस प्राचार्य वामनराव अभ्यंकर आणि डॉ. सौ. श्यामलाताई वनारसे यांचे मार्गदर्शन लाभले. पहिल्या पालक सभेला सौ. विद्याताई बाळ ह्यांच्या व्याख्यानाचा छान उपयोग झाला. या सभेसाठी शिक्षकांनी पालकांना अगोदर भेटून त्यांचे मुलांसंबंधीचे प्रश्न आणून त्यांची समर्पक व प्रभावी उत्तरे सौ. वनारसे ह्यांनी दिली.
२ ) एकूण ४५ मुलांची वैद्यकीय तपासणी घेण्यात आली. आवश्यक त्या मुलांसाठी त्वरित औषधयोजना करण्यात आली, तर दोन मुलांवर तातडीने शस्त्रक्रियाही करण्यात आल्या.
३ ) दर आठवड्यात दोनदा सर्व मुलांना पूरक आहार देण्यात येतो.
४ ) दै. सकाळच्या कचेरीला भेट देऊन मुलांनी मुद्रण विषयक व बहुरंगी छपाई विषयक माहिती मिळविली.
५ ) ज्ञानप्रबोधिनीचा शिवापूर येथील प्रकल्प मुलांनी तेथे जाऊन समजावून घेतला.
६ ) सहली :
अ ) शिवापूर सायकल सफर :
ब ) शिवनेरी सायकल सफर :
क) तळेगांव दाभाडे सहल : या भेटीत मुलांनी कांच कारखाना, भंडारा डोंगर व रामभाऊ परुळेकर विद्यालय ही आश्रमीय शाळा यांची जवळून माहिती मिळविली.
७ ) महर्षी कर्वे, जगदीशचंद्र बोस इ. च्या जीवनावर आधारित लघुपट व काही शास्त्रीय विषयावरील चित्रपट मुलांना दाखविण्यात आले.

## कर्तव्याची जाणिव नसता, प्रगतीलाही अर्थ नसे ...

विविध व्याख्याने, शिबिरे, सहली... असे विविध कार्यक्रम सतत चालू आहेत आणि त्याचा परिणाम मुलांच्या वागण्यात, बोलण्यात, विचारात कमी अधिक जरूर दिसून येतो. या वर्षातील काही घटना मुलांच्या मनातील विचारच बोलून दाखवू शकतील असे वाटते.
१ ) जाडीतळ झोपडपट्टीतील १००० बांधवांना मुलांनी रक्षाबंधन केले.
२ ) दिवाळीच्या पाडव्याच्या दिवशी याच झोपडपट्टीतील १५० घरांमध्ये मिठाई वाटपही केले. यासाठी मुलांनी स्वतःच्या घरांतून काही फराळाचे पदार्थ आणले होते.

३ ) दिवाळीच्या पाडव्याच्या दिवशी वर्धिनीतील एक विद्यार्थी २ शिक्षकांसमवेत बालग्राम-मधील अनाथ मुलांना मिठाई देण्यासाठी मुद्दाम पुण्याहून लोणावळ्यास जाऊन आला.

४ ) चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील गिरिकन्या शिबिरास वर्धिनीच्या मुलांनी मदत केली.

५ ) समाज ऐक्य समिती व ज्ञानप्रबोधिनी यांनी आयोजित केलेल्या आदर्श गणपती विसर्जन मिरवणूक स्पर्धेत वर्धिनीच्या झांजपथकास ३ रे बक्षिसाचे रु. २००/- मिळाले.

६ ) मुंबई शिबिरात श्रध्दानंद महिलाश्रमास भेट दिली असता, तेथे मुलांनी आपणाहून पैसे गोळा करून त्या बहुमोल कार्यास मुलांची फूल ना फुलाची पाकळी अर्पण केली. रक्कम किती जमा झाली याला महत्त्व नाही. अशा कार्यास मदत केली पाहिजे हा विचार त्यांच्या मनात निर्माण झाला हे अतिशय महत्त्वाचे व मोलाचे वाटते.

७ ) मुलांचा बुजरेपणा कमी व्हावा, त्यांनी समाजाचे निरिक्षण करावे या उद्देशाने लोणावळा शिबिरापूर्वी ग्राहकपेठेच्या सहकार्याने एक वस्तू विक्री योजना आखली होती. ५० मुलांनी, ८ दिवसात, पुणे स्टेशन ते पुणे विद्यापीठ या परिसरात रु ६५०० चा माल विकला व या निमित्ताने ५०० घरांमध्ये वर्धिनीची माहिती सांगितली.

८ ) मुंबई शिबिरानंतर लगेचच ९ नोव्हेंबर १९८९ रोजी दूरदर्शन केंद्राने वर्धिनीतील ४ शिक्षक व १० विद्यार्थी यांची 'युवदर्शन' या कार्यक्रमात मुलाखत प्रसारित केली. मुलाखतीचा हा कार्यक्रम अर्धा तास होता.

९ ) आत्तापर्यंत सर्व शिबिरात इंदिरा कम्युनिटी किचन या संस्थेने अल्पदरात उत्तम दर्जाचा अल्पोपहार व जेवण पुरविले.

## घेतला वसा टाकणार नाही-----

असा हा उपक्रम आहे. आम्हाला पूर्ण कल्पना आहे की,
आमची ताकद मर्यादित आहे. पण धडपड केलीच पाहिजे.
उराशी बाळगलेले स्वप्न आपल्या परीने साकार करीत
आणावयाचे आहे. अडचणी किती जरी आल्या तरी
एवढे मात्र पक्के ............

............ घेतला वसा टाकणार नाही.
............ पेटली मशाल विझणार नाही.

| | | |
|---|---|---|
| पु. व. श्रॉफ<br>अध्यक्ष, | रा. प. देसाई<br>कार्यवाह, | अ. न. गोगावले<br>उपाध्यक्ष, |


संपर्क

श्री. रा. प. देसाई,
४००, सोमवार पेठ
पुणे - ४११०११.
( दूरध्वनी - २११३५ )

श्री. कृ. ल. पटवर्धन
४२८/२०, शिवाजीनगर
पुणे - ४११०१६.
( दूरध्वनी - ५५८३५ )


व्ही के. खळदकर
25790